**सं.फौ.ख.क्र. ९२१/२०२३**
**सरकार विरूध्द स्वप्निल ठाकरे,**
**नि.क्र. २९**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०८**

मी या व्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नांव : म.ना.पो.कॉ. अर्चना शामकिरण पाटील,**
वय : ४० वर्षे, धंदा : नोकरी, पो.स्टे. नांदगाव खंडे,
रा.नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती

**विशेष सरकारी अभियोक्ता श्रीमती पी. एस. खंडारे मॅडम यांचे मार्फत सरतपास शपथेवर सुरू.**

**०१.** मी सन—२०२१ पासुन पोलिस स्टेशन नांदगाव खंडेश्वर येथे महिला ना.पो. कॉ. या पदावर कार्यरत आहे. दिनांक १७/०२/२०२३ रोजी माझी स्टेशन डायरीवर ड्युटी होती. त्यादिवशी माझ्याकडे अभिजीत सुनिल खंडार हे तक्रार देण्याकरीता आले होते. त्यांच्या काकांचा अपघात हा एका दुचाकी चालकाने निष्काळजीपणे चालविल्यामुळे मयत झाल्याबाबतची तक्रार पोलीस स्टेशनला दाखल केली होती. सदर तक्रार मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवुन घेतली होती. आता मला नि.क्र. १८ वरील सदर तक्रार दाखविण्यात आली, त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी व फिर्यादीची सही आहे. त्यानंतर पुढील तपास ए.एस.आय. खंडारे यांच्याकडे सोपविण्यात आला होता.

**सरतपास संपला.**

**आरोपी तर्फे श्री. ए. एस. बावनकुळे वकिल यांचे मार्फत साक्षीदाराचा उलटतपास**

**०२.** मी दिनांक १७/०२/२०२३ रोजी पोलीस स्टेशन, नांदगाव खंडेश्वर येथे स्टेशन डायरीवर ड्युटी असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा तपासी अधिकारी यांनी सदर प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी १७.०२.२०२३ रोजी स्टेशन डायरीवर ड्युटीवर नसल्यामुळे तसा कागदोपत्री पुरावा प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०४.०२.२०२३ रोजी अशी कोणतीही घटना घडली नसल्यामुळे दिनांक १७.०२.२०२३ रोजी फिर्यादीच्या सांगण्यावरून मी खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

दिनांक : ०४.१२.२०२५

सा.वा.दा.ब.अ.क.केले.

CHHAYA SHAMKUMAR MEHARE
Digitally signed by CHHAYA SHAMKUMAR MEHARE
Date: 2025.12.04 17:21:02 +0530

**(छाया शा. मेहरे)**
न्यायदंडाधिकारी (प्र.श्रे.),
नांदगांव खंडे.,न्यायालय क्र.२,

समक्ष,

CHHAYA SHAMKUMAR MEHARE
Digitally signed by CHHAYA SHAMKUMAR MEHARE
Date: 2025.12.04 17:21:05 +0530

**(छाया शा. मेहरे)**
न्यायदंडाधिकारी (प्र.श्रे.),
नांदगांव खंडे.,न्यायालय क्र.२,